**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः19.09.2025** **वारःशुक्रवार**

---

- राज्यातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं शिक्षण देण्यासाठी शालेय शिक्षण विभागाचा केंब्रिज विद्यापीठाबरोबर करार
- बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी शाश्वत बाजारपेठ तयार करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
- देशभरातल्या संपूर्ण मतदान प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचा काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा आरोप केंद्रीय निवडणूक आयोगानं फेटाळला
- आणि
- युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीत महाबळेश्वर आणि पाचगणीचा समावेश

- आता सविस्तर बातम्या

**केंब्रिज-करार**

राज्याचा शालेय शिक्षण विभाग आणि केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडिया दरम्यान काल सामंजस्य करार करण्यात आला. हा

सामंजस्य करार राज्यातील शालेय शिक्षणाला जागतिक दर्जा प्राप्त होण्यासाठीचा नवा टप्पा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. केंब्रिजने शिक्षण क्षेत्रात विकसित केलेल्या चांगल्या पद्धतींमुळे राज्यातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**बांबू परिषद**

कृषी क्षेत्रातील हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी बांबू लागवड उपयुक्त ठरणार आहे; बांबू लागवडीकडे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी वळावं, यासाठी बांबूची शाश्वत बाजारपेठ तयार करण्यात येईल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत केलं. आंतरराष्ट्रीय बांबू दिनानिमित्त आयोजित बांबू परिषदेमध्ये ते बोलत होते. हरित महाराष्ट्राचं स्वप्न साकार करण्यासाठी राज्य शासन 21 लाख हेक्टरवर बांबू लागवड करण्यास कटिबद्ध असल्याचं रोजगार हमी आणि फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी या परिषदेत सांगितलं.

**पंतप्रधान-चित्रपट**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 75व्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय पुरस्कार विजेता चित्रपट, ‘चलो जीते हैं’ हा काल, देशभरातील अनेक शाळा आणि

चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या बालपणीच्या घटनावर आधारित या चित्रपटाचं दिग्दर्शन मंगेश हडवळे यांनी केलं आहे. 2 ऑक्टोबरपर्यंत हा चित्रपट विविध शहरांमध्ये दाखवला जाणार आहे. हा चित्रपट पाहिल्यानंतर कोपर खैरणे इथल्या विश्वभारती महाविद्यालयातल्या रमा गोरूजे या विद्यार्थ्यीनीने दिलेली प्रतिक्रिया...

बाइट

**महिला सक्षमिकरण**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार, सेवा आणि सुशासन हा मंत्र जपत देशात परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. 'सेवा पर्व' या आजच्या विशेष मालिकेत मोदी सरकारने महिला सक्षमीकरण अधिक बळकट करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा हा लेखा-जोखा.

गेल्या 11 वर्षांत भारत सरकारने महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि कायदेविषयक क्षेत्रात सक्षम करण्यासाठी व्यापक आणि धोरणात्मक पावलं उचलली आहेत. 'नारी शक्ति' हा केवळ नारा नसून ते आता राष्ट्रीय अभियान बनलं आहे. हे अभियान शहरी असो वा ग्रामीण, तरुण असो वा वृद्ध, प्रत्येक महिलेला सन्मानाने, सुरक्षितपणे आणि स्वावलंबनाने

जगण्यासाठी बळकटी देते. केवळ महिलांचा विकास यावर लक्ष केंद्रित नसून, महिला नेतृत्वाखाली विकास कसा साध्य  करता येईल यावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

महिला सक्षमीकरणाबाबत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात..

**बाइट पंतप्रधान नरेंद्र मोदी**

‘बेटी बचाओ, बेटी पढाओ’, ‘लखपति दीदी’ यासारखे उपक्रम या सक्षमीकरणाला अधिक बळकटी देतात. अशाप्रकारे, तळागाळातील प्रशासनापासून ते संरक्षण दल आणि विमानवाहतुकीपर्यंत, महिला आता सर्व क्षेत्रांमध्ये नेतृत्व करत आहेत आणि सर्वसमावेशक आणि शाश्वत राष्ट्रीय विकासाला चालना देत आहेत.

**राहुल गांधी**

देशभरातल्या मतदान प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याचा आरोप लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काल पुन्हा नवी दिल्लीत वार्ताहर परिषद घेऊन केला. यासाठी त्यांनी महाराष्ट्रातल्या राजुरा आणि कर्नाटकातल्या आळंद विधानसभा मतदार संघातली उदाहरणं उपस्थितांच्या समोर मांडली. बनावट अर्ज, काही सॉफ्टवेअर वापरुन

मतदारांची नावं वगळणं, बोगस मतदार घुसवणं हे प्रकार झाल्याचा दावा त्यांनी केला. दरम्यान, राहुल गांधी यांनी केलेले सर्व आरोप निराधार असल्याचं केंद्रीय निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. ऑनलाइन पद्धतीने मतदारांना वगळता येत नसल्याचं स्पष्टीकरण आयोगानं दिलं आहे.

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

नंदुरबार जिल्ह्याची 'कुपोषणग्रस्त' जिल्हा म्हणून ओळख आहे. या आदिवासीबहुल जिल्हयातल्या टोकरतलाव इथली अंगणवाडी सध्या चर्चेचा विषय झाली आहे. ऐकुया या विषयीची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून .....

असं म्हणतात, कोणत्याही चांगल्या गोष्टीची सुरुवात स्वतःपासून करावी. याच उक्तीने, नंदुरबार जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी डॉ. मितालीसेठी आणि त्यांचे पती डॉ वैभव सबनीस यांनी आपल्या 'शुकर' आणि 'सबर' या जुळ्या मुलांना इथल्या अंगणवाडीत पाठवण्याचा निर्णय घेतला. या तीन वर्षीय बालकांचा अंगणवाडी प्रवेशसर्वांसाठी आश्चर्याचा आणि आनंदाचा धक्का होता. पहिल्या दिवशी गणवेशात नसलेली जिल्हाधिकाऱ्यांची मुलं

आज सर्वसामान्य कुटुंबाच्या मुलांप्रमाणे अंगणवाडीच्या गणवेशात अंगणवाडीमध्ये आनंद लुटतांना दिसून येत आहेत. आपल्या या निर्णयाबद्दल बोलताना जिल्हाधिकारी डॉक्टरमिताली सेठी म्हणाल्या..

**बाइट**

सामाजिक दायीत्वाचं भान जोपासत जिल्हाधिकाऱ्यांची ही कृती निश्चितच सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. या स्पृहणीय कामाची दखल घेतली आमचे नंदुरबारचे वार्ताहर नीलेश पवार यांनी. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून सविता म्हसकर यांच्यासह प्रशांत जाधव.

**यूनेस्को**

युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीत भारतातल्या सात नवीन नैसर्गिक स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये राज्यातील पाचगणी आणि महाबळेश्वर इथल्या डेक्कन ट्रॅप्सचा समावेश आहे. पाचगणी आणि महाबळेश्वर इथले डेक्कन ट्रॅप्स ही कोयना अभयारण्याच्या परिसरात जांभा दगडांची वैशिष्ट्यपूर्ण रचना आहे. ही रचना लाव्हा रसाच्या 40पेक्षा जास्त थरांमुळे निर्माण झाली असून दख्खन पठाराचा हा भाग जांभा दगडापासून बनलेल्या जगातल्या सर्वात मोठ्या भूभागांपैकी एक आहे.

**निधन**

धाराशिव इथले ज्येष्ठ पत्रकार दिलीप पाठक नारीकर यांचं आज पहाटे हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं. ते 67 वर्षांचे होते. दैनिक सकाळमध्ये त्यांनी दीर्घकाळ काम केलं होतं. अनेक सामाजिक उपक्रमातही त्यांचा सहभाग होता. त्यांच्या पार्थिव देहावर आज दुपारी धाराशिव इथं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**अपघात**

बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यात चिखली रणथम परिसरात झालेल्या एका रस्ते अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला असून चार जण जखमी झाले आहेत. मृत्यूमुखी पडलेले सर्व जण जळगाव जिल्ह्यातील रहिवासी होते.

**आशिया करंडक**

आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना ग्रुप एमध्ये ओमानशी होणार आहे. अबूधाबीच्या शेख झायेद मैदानावर रात्री आठ वाजता हा सामना सुरू होईल.

**हवामान**

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी, तर मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

- राज्यातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं शिक्षण देण्यासाठी शालेय शिक्षण विभागाचा केंब्रिज विद्यापीठाबरोबर करार
- बांबू लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी शाश्वत बाजारपेठ तयार करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
- देशभरातल्या संपूर्ण मतदान प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचा काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा आरोप केंद्रीय निवडणूक आयोगानं फेटाळला
- आणि
- युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या तात्पुरत्या यादीत महाबळेश्वर आणि पाचगणीचा समावेश

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.